ARTHA, Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारीं
प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १५ एप्रिल, १९६४ | अंक ८



### रशिआला दारूची निर्यात

भारतामधील मदिरेला रशिआंत बाजारपेठ मिळते किंवा काय हें पाहण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे. प्रयोग म्हणून भारतांत तयार करण्यांत आलेली बीर, रम, ब्रँडी इत्यादि प्रकारची दारू रशिआला निर्यात करण्याचें घाटत आहे. गेल्या वर्षी भारतामधील उद्योगधंद्यांचें एक प्रदर्शन मॉस्को येथें भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनाला भेट देणाऱ्या रशिआंतील नागरिकांना भारतामधील कांहीं प्रकारची दारू फार आवडली होती. हा अनुभव लक्षांत घेऊन दारूच्या निर्यातीचा प्रयोग करण्यांत येत आहे. त्याशिवाय आंबा, केळीं, लिंबें, इत्यादि फळेंहि रशिआला पाठविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. हीं फळें रशिआंत पोंचेपर्यंत टिकवावीं कशीं, हा मात्र प्रश्न आहे.

### सामुदायिक शेती फसली ?

रशिआंतील सामुदायिक शेती अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याच्या बाबतींत यशस्वी ठरली नाहीं. उलट त्या शेतावर काम करणाऱ्यांना दिलेल्या स्वतःच्या छोट्या शेतींत मात्र उत्पादन वाढण्याची प्रवृत्ति दिसून आली. ही परिस्थिति लक्षांत घेऊन रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं सामुदायिक शेतीच्या संघटनेंत कांहीं बदल करून छोट्या शेतकऱ्यांना पिकें काढण्याबद्दल स्वातंत्र्य दिलें. आतां झेकोस्लोव्हाकिआंतहि सामुदायिक शेतीचें अपयश अप्रत्यक्ष रीत्या कबूल करण्यांत येत असून ह्या अवाढव्य शेतीचे तुकडे करून ते शेतकऱ्यांना कसण्यास देण्यांत यावेत असें सुचविण्यांत येत आहे. खुद्द सरकार ह्या प्रचाराला विरोध करीत नाहीं.

### औषधि वनस्पतींची लागवड

भारताच्या मध्यवर्ती औषधि वनस्पति संघटनेनें औषधि वनस्पतींची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्याचें ठरविलें आहे. औषधि वनस्पतींच्या निर्यातीसाठी आणि देशी औषधालयांना पुरवठा करण्याच्या हेतूनें हा उपक्रम हातीं घेण्यांत आला आहे. केरळ राज्यांत ३०० एकर जमीन आणि शिलाँगमध्यें १ हजार एकर जमीन लागवडीसाठी ताब्यांत घेण्यांत येणार आहे. संघटनेतर्फे अशा प्रकारची औषधि बागायत ह्या पूर्वींच करण्यांत येत आहे. जम्मू-काश्मीर भागांत आणि बंगलोरमध्यें अशी लागवड सध्यां करण्यांत येत आहे. औषधि आणि सुगंधी द्रव्यें देणाऱ्या वनस्पतींची राष्ट्रीय पहाणी करण्याचें संघटनेच्या कार्यकारी मंडळानें ठरविलें आहे.

### नव्या कोळसा खाणीचें उद्घाटन

नागपूरपासून १५ मैलांवर सिलवाडा ह्या ठिकाणीं महाराष्ट्रांतील आणखी एका कोळसाखाणीचें उद्घाटन करण्यांत आलें. राष्ट्रीय कोळसा विकास मंडळातर्फे चालविण्यांत येणारी महाराष्ट्रांतील ही दुसरी खाण आहे. खाणीचा विस्तार ७०० एकरांवर पसरलेला असून तेथील कोळशाचा साठा सुमारें ३.५ कोटी टन असावा. खाणींतून दरसाल ५ लाख टन कोळसा निघूं शकेल. खाणींत १,००० कामगारांना रोजगार मिळाला आहे.

### सुताची सहकारी गिरणी

ठाणें जिल्हा सहकारी औद्योगिक संघाला मध्यवर्ती सरकारनें सूत कातण्याची सहकारी गिरणी काढण्यासाठी परवाना दिला आहे. भिवंडी येथें काढण्यांत यावयाच्या ह्या गिरणींत २५ हजार चात्या बसविण्यांत येतील. भिवंडी येथें २० हजार यंत्रमाग असून त्यांची सुताची मागणी ही गिरणी पुरवील. भिवंडी हें ठिकाण महाराष्ट्रांतील यंत्रमागाचें एक मुख केंद्र आहे.

### उत्पादन-खर्च कमी करण्याचें महत्त्व

इंडस्ट्रिअल क्रेडिट ॲन्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. जी. एल. मेहता ह्यांनीं इंस्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रिअल एंजिनिअरिंग ह्या संस्थेच्या वार्षिक बैठकीचें उद्घाटन करतांना हिंदमधील उद्योगधंद्याबद्दल महत्त्वाचे विचार प्रदर्शित केले आहेत. उद्योगधंद्यांत एंजिनिअरिंगचीं तत्त्वें अंमलांत आणणें कसें जरुरीचें आहे हें सांगतांना ते म्हणाले कीं, उत्पादनांतील कार्यक्षमता ही केवळ व्यवस्थापकीय संघटनेची कसोटी आहे असें नव्हे. जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठीहि तिची अतिशय आवश्यकता आहे. परंतु ही बाब हिंदमधील उद्योगधंदे लक्षांत घेत नाहींत. देशांतील वस्तूंची टंचाई आणि संरक्षित अर्थव्यवस्था ह्यांच्यावर विसंबून राहिल्यानें भारतामधील उद्योगधंदे स्वसंतुष्ट झालेले आहेत. उत्पादनाचा जबर खर्च व कमी उत्पादन ह्यांच्यामुळें भारताच्या निर्यातींत वाढ करणें शक्य होत नाहीं. औद्योगिक एंजिनीअर्सनीं जास्तींत जास्त उत्पादन आणि कमींत कमी खर्चांत अनेक वस्तूंचें संस्करण साधणाऱ्या उत्पादनपद्धति शोधून काढल्या पाहिजेत. उद्योगधंद्यांनीं परदेशांतील बाजारपेठांत भारताच्या मालाला तोंड द्याव्या लागणाऱ्या स्पर्धेची जाणीव ठेवली पाहिजे आणि त्या अनुरोधानें आपल्या उत्पादन पद्धतींत सुधारणा घडवून आणली पाहिजे. तथापि ह्याचा अर्थ पाश्चात्त्य देशांतील उत्पादनाच्या पद्धति येथें जशाच्या तशा अंमलांत आणाव्या असा मात्र नाहीं. त्या तशाच अंमलांत आणल्यावर उद्योगधंद्यांवर विपरीत परिणामच होईल.

### गोव्याचें विलिनीकरण : बँकरचें मत

" आपल्या बँकेनें गोव्यांत वॉस्को डि गामा येथें गेल्या एप्रिलमध्यें शाखा उघडली. परंतु तिची प्रगति मंदगतीनेंच होत आहे. गोव्याचें आर्थिक पुनरुज्जीवन करण्याची मध्यवर्ती सरकारची इच्छा सफल व्हावयाची असेल, तर गोवा मोठ्या प्रदेशांत विलीन करूनच तें साधतां येईल." :—चार्टर्ड बँकेचे चेअरमन, मि. व्ही. ए. ग्रँथॅम ह्यांचें निवेदन.


५ वर्षे व अधिक मुदतीच्या ठेवीवर आतां

५ १/८

टक्के व्याज मिळवा...

घरच्यापेक्षां महाराष्ट्र बँकेंत पैसे सुरक्षित राहून व्याजहि भरपूर मिळतें. सेव्हिंग्ज खात्यावरहि ३% व्याज. चेकनें पैसे काढण्याची सोय. मुदतीच्या ठेवीवर ४१/८% ते ५१/८% व्याज मिळतें. विविध बचत योजनांचे माहितीपत्रक मागवा.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

644 ११७७, बुधवार पेठ, पुणें-२

# अर्थ

बुधवार, १५ एप्रिल, १९६४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्रीमंत मुंबईमधील दारिद्र्याची कमाल

### ९६% लोकांचें जीवन असह्य

मुंबई शहराची आर्थिक पाहणी १९५४ ते १९५७ ह्या मुदतींत करण्यांत आली; १९५९ मध्यें अहवाल तयार झाला आणि १९६३ मध्यें तो प्रसिद्ध झाला. ८६३ पृष्ठांचा आणि रु. ३६=५० किंमतीचा हा अहवाल मुंबई विद्यापीठानें प्रसिद्ध केला आहे. मुंबईमधील सर्वांत ज्यास्त लोक मराठी भाषा बोलतात; १९.९% लोक गुजराती आणि कोंकणी बोलतात. हिंदी, उर्दू आणि दक्षिण भारतीय भाषिकांची संख्या वाढत आहे. पारशी आणि ज्यू ह्यांची संख्या फारच थोडी आहे. निम्मे लोक साक्षर आहेत; स्त्रियांत साक्षरतेचें प्रमाण ३८.८% आहे. कामगार स्त्रियांची संख्या कमी झाली आहे, पण मध्यमवर्गीय स्त्रिया अधिकाधिक नोकऱ्या शोधूं लागल्या आहेत. करमणुकीसाठी सिनेमाची लोकप्रियता वाढत आहे. बहुतेक शिक्षित लोक वृत्तपत्रें वाचतात, पण फक्त २३% लोक एखादें पुस्तकहि वाचतात. पत्त्यांचा खेळ बऱ्याच घरांतून खेळला जातो; चालणें हाच बहुतेकांचा व्यायाम आहे. धर्माचें महत्त्व कमी होऊन पैशाचें आकर्षण वाढलें आहे.

फाळणीच्या वेळीं पुष्कळ लोक मुंबईंत आले. त्यांत सिंधी बहुसंख्य होते. व्यापाराची संधि वाढत गेली, त्याप्रमाणे श्रीमंत लोकांचा नवा वर्ग उदयाला आला. उत्पन्न वाढलें म्हणजे उच्च शिक्षण मिळूं शकतें आणि भांडवलाच्या संचयामुळें मर्यादित लोकांत अर्थोत्पादन एकवटतें. सर्व जमातींत पारशी लोक संपन्न असून त्यांचे खालोखाल जैनांची संपत्ति आहे. हिंदु किंवा मुसल्मान ह्यांपेक्षा ख्रिस्ती बऱ्या स्थितींत आहेत. व्यापारी जातींच्या तुलनेनें ब्राह्मणांचा अनुक्रम सर्वांत खालीं लागतो.

उद्योगधंदे वाढल्यामुळें मजुरी वाढली असेल, अशी कल्पना. परंतु ३७% लोकांचा रोजगार महिना ३७ रु. पेक्षाही कमी आहे. २०% लोकांना महिना २० रु. हि मिळत नाहींत ! गरिबांनाहि मुंबईबाहेरचे आपले नातेवाईक पोसावे लागतात आणि त्यामुळें जगण्यासाठी धडपड आणि स्पर्धा भयंकर चालते. मग बचतीची गोष्टच नको; कर्जबाजारीपणा सर्वत्र पसरला आहे.

प्राप्ति कमी असल्यामुळें पुरेसें अन्न मिळणें आणि रहाण्यासाठी बिऱ्हाड असणें अशक्यप्राय होतें. ४०% लोकांना विजेचा प्रकाश मिळत नाहीं. कित्येकजण रस्त्यावरचा दिवा, रॉकेलचा दिवा किंवा मेणबत्ती ह्यावर भागवतात. कितीतरी बिऱ्हाडांना संडास, बाथरूम, पाण्याचा नळ, ह्यांची सोय नाहीं. दर चौरस मैलास ९१,९३५ एवढी दाट वस्ती मुंबईंत आहे.

भारतांतील सर्वांत श्रीमंत शहरांतील दारिद्र्याची तीव्रता आणि ५ लक्ष गिरणी कामगारांची मजबूत संघटना, ह्यामुळें बाकीच्यांत असंतोष अपरिहार्य होतो. बेकारीच्या दाबामुळें मजुरीचा दर अत्यल्प रहातो. त्यांचा सरकारकडे बघण्याचा दृष्टिकोण सहाजिकच निरोगी नाहीं. अवार्डच्या द्वारा रोजगार वाढविण्याच्या प्रयत्नांचा कामगारांच्या संघटनेबाहेरील लक्षावधि लोकांवर कांहींहि सुपरिणाम होऊं शकत नाहीं. किरकोळ फेरीवाले भारी दरानें कर्ज काढून, माल विक्रींतून कसेबसे पोट भरीत असतात. रहाण्याला जागा, अन्न, शिक्षण आणि करमणूक ह्या दृष्टीनें समाधानकारक स्थिति असणारे मुंबईंत ४% लोकहि नाहींत. गरीब आणि मध्यमवर्गीयांचे बाबतींत अडचणी वाढत आहेत. नव्या सोई त्यांच्या वांट्यास येतच नाहींत; कादंबऱ्या आणि सामाजिक चित्रपट कांहींहि सांगोत ! दारिद्र्यामुळे आर्थिक कार्यक्षमता शक्य होत नाहीं; यंत्रसामग्रीइतकेंच मानवी भांडवलालाहि महत्त्व आहे. पण आज तें मिळूं शकत नाहीं.

---

## परदेशीय भांडवलाला दिलेल्या प्रोत्साहनानें आनंद

कॅनडांतील कारखानदारांचें एक सदिच्छा मंडळ भारताच्या दौऱ्यावर आलें होतें. भारतांत परदेशीय भांडवल आकर्षून घेण्यासाठी कोणत्या सवलती देण्यांत आल्या आहेत तें समजून घेण्यासाठी मंडळानें पोलाद आणि खाण-मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांची भेट घेतली. त्यावेळीं भारत सरकारच्या संबंधित अधिकाऱ्यांनीं भारताच्या गरजांची आणि परदेशीय भांडवलाला सरकारनें दिलेल्या सवलतींची मंडळाला तपशीलवार कल्पना दिली. मंडळाचे नेते श्री. अँडरसन ह्यांनीं भारत सरकारनें देऊं केलेल्या सवलतीबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले कीं भारत सरकारने देऊं केलेल्या सवलती समजल्यावर मंडळाला आश्चर्यच वाटलें. परदेशीय भांडवलाला आकर्षण करून घेण्यासाठी करांच्या व इतर बाबतींत इतक्या सोयी-सवलती दिलेल्या असतील ह्याची कॅनडामधील उद्योगपतींना कल्पनाही नव्हती. कागद आणि तो तयार करण्यासाठी लागणारा लगदा तयार करण्याचा उद्योगधंदा उभारण्याच्या बाबतींत कॅनडा भारताला साह्य करूं शकेल. भारताला कोणत्या प्रकारच्या मदतीची जरुरी आहे ह्याची कल्पना आतां मंडळाला आली आहे. भारत सरकारनें पुरविलेल्या ह्या माहितीचा चांगला अभ्यास केल्यावर औद्योगिक विकासाबाबत कोणतें अधिक सहकार्य देतां येईल ह्याचा विचार करता येईल. कॅनडांतील खाजगी मालकीचें भांडवल भारतांत गुंतविण्यासंबंधीं ज्या अडचणी आहेत त्या लवकरच निकालांत निघतील आणि अधिक कॅनडिअन भांडवल भारतांत येईल असा विश्वास वाटतो.

---

## उद्बोधक उद्गार

### मुलें—म्हातारपणचा आधार !

" म्हातारपणीं उपजीविकेचें दुसरें कोणतेंहि साधन नसल्यामुळेंच हिंदी आईबापांना अपत्यांची गरज भासते. स्वतःचीं मुलें नसलीं तरीसुद्धां म्हातारपणीं बरें जगतां येईल अशी त्यांची खात्री पटली, तरच लोकसंख्येचें नियंत्रण यशस्वी होऊं शकेल. "

—प्रा. डी. डी. कोसंबी.

## जपाननें केलेली शेतीमधील प्रगति

जगांतील दारिद्र्याविरुद्ध आणि भुकेविरुद्ध यशस्वीपणानें सामना द्यावयाचा असेल तर अविकसित देशांतील अन्नधान्याचें उत्पादन सध्यांपेक्षा अधिक वेगानें वाढलें पाहिजे असा इशारा संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतीविभागाचे प्रमुख श्री. सेन ह्यांनीं नुकताच इशारा दिला होता. हा इशारा अतिपूर्वेकडील देशांच्या बाबतींत विशेषत्वानें महत्त्वाचा आहे. कारण हा भूभाग अतिशय दाट लोकवस्तीचा आहे. ह्या भागांतील अन्नधान्याच्या उत्पादनाचें युद्धपूर्वकालांतील दरडोई प्रमाण वाढण्याऐवजीं घटतच चाललें आहे. १९६०–६१ सालांत मात्र युद्धपूर्व कालांतील उत्पादनाचें प्रमाण पुन्हा गाठण्यांत आलें होतें.

ह्या निराशाजनक चित्राला जपानचा मात्र अपवाद आहे. जपानमधील तांदुळाचें आणि गव्हाचें दर एकरीं उत्पादन आशियांतील दर एकरीं सरासरी उत्पादनाच्या दुप्पट आहे. कांहीं कांहीं देशांच्या मानानें तर जपानचें उत्पादन चौपट अधिक आहे. जवळ जवळ सर्वच पिकांच्या दर एकरीं उत्पादनाच्या बाबतींत जपानचा अनुक्रम पहिला लागतो. शेतीच्या व्यवसायांत जपाननें घडविलेला हा चमत्कारच म्हणावा लागेल. ही प्रगति साधण्यासाठीं जपानला भौगोलिक परिस्थिति अतिशय अनुकूल आहे, असेंहि नाहीं. ह्या भू–भागांतील इतर कित्येक देशांच्या मानानें जपानमध्यें थंडी अधिक असते आणि पिकें तयार होण्याचा हंगाम लहान असतो. त्याशिवाय अधून मधून होणारे भूकंप, वादळें ह्यांचाहि जपानच्या शेतीला उपद्रव होतो. जपानमधील शेतीच्या जमिनीचे लहान लहान तुकडे झालेले आहेत आणि जमिनीचा कसहि बेताचाच आहे आणि सर्वांवर कळस म्हणजे जपान हा अतिशय दाट लोकवस्तीचा देश आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर कसण्यांत येत असलेल्या शेतजमिनींपैकीं ८० टक्के जमीन भूविहीन शेतकऱ्यांना अगर अपुरी शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना विकण्यांत आली. ही जमीन सुमारें ४५ लाख एकर होती. त्याशिवाय सरकारी मालकीची, पडीक आणि गवती कुरणाची सुमारें २५ लाख एकर जमीनहि अशीच वाटण्यांत आली. महायुद्धाच्या समाप्तीनंतर कोरिआकडून अगर फोर्मोसाकडून अन्नधान्याची आयात करता येणें शक्य होणार नाहीं हें जपानला समजून चुकलें. म्हणून जपानच्या सरकारनें शेतकऱ्यांना आर्थिक मदत देऊं करून भूविकासाचे अनेक कार्यक्रम हातीं घेतले त्यामुळें आणखी ५४ लाख एकर जमीन लागवडीयोग्य झाली. त्याचबरोबर पाणीपुरवठा आणि पाणथळ जमिनींतील पाण्यांतील निचरा करण्याचीं कामें चालू करण्यांत आलीं. तीं पूर्ण झाल्यावर एकपिकी जमिनी दुपिकी अगर तिपिकी झाल्या. अर्थात् जपानच्या अद्ययावत् तंत्रविज्ञानामुळेंच हें शक्य झालें. जपानच्या शेतकी संशोधन संस्थांनीं सुधारलेल्या जातींचीं बीं-बियाणें शोधून काढलीं. परिणामीं कांहीं पिकांचें दर एकरीं उत्पादन दुप्पट झालें आहे.

जपानमधील शेतीव्यवसायांत यंत्रांचा अधिकाधिक उपयोग करण्यांत येत आहे. १९५६ सालापासून भातशेतीच्या व्यवसायांतील अंगमेहनतीचा भाग १० टक्क्यांनीं आणि गव्हाच्या शेतींतील २० टक्क्यांनीं कमी झालेला आहे. त्यामुळें शेतकऱ्यानें आपल्या शेतींत गुंतविलेल्या भांडवलाच्या मानानें जपानी शेतकऱ्यांचें उत्पन्न इतर देशांतील शेतकऱ्यांच्या उत्पादनापेक्षा अधिक आहे. ह्या उत्पन्नाची सरासरी सुमारें ५०० पौंड आहे.

---


# दि सांगली बँक लि.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० चे वर |
| रिझर्व्ह फंडस् | रु. १०,००,००० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ४ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २३ शाखा

★ आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे अद्ययावत् व्यवहार योग्य तऱ्हेनें केले जातात.

★ हेड ऑफिस सांगली व इचलकरंजी, रविवार पेठ–पुणें आणि बेळगांव या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची सोय करण्यांत आली आहे.

अधिक माहितीसाठीं नजिकच्या शाखाधिकाऱ्यास अवश्य भेटा.

रजिस्टर्ड ऑफिस
राजवाडा चौक
सांगली.

एम्. के. गुते
M. A., LL. B., C. A. I. I. B.
मॅनेजर.



# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवर बँक

—ः वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

सेव्हिंग्ज् बँकः–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के, ४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई–दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

दि. ३१–१२–१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु | ४,८०,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी,
बी. ए., बी. कॉम.,
जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले,
बी. ए., बी कॉम., सी. ए. आय. आय. बी.
चेअरमन.

### हातमागाच्या कापडाची निर्यात

हातमागाच्या आणि हस्तव्यवसायाच्या मालाची निर्यात वाढविण्यासाठी स्थापन करण्यांत आलेल्या मंडळानें न्यूयॉर्क शहरांत एक कचेरी उघडण्याचें ठरविलें आहे. ह्या मंडळाच्या मॅनेजिंग डायरेक्टर श्रीमती जयकर म्हणाल्या कीं हातमागाच्या कापडाची अमेरिकेला करण्यांत येणारी निर्यात वाढत चाललेली आहे. १९५९ सालीं अवघे ३० लाख रुपयांचे हातमागावरील कापड निर्यात करण्यांत आलें होतें. १९६३ सालीं ५ कोटी रुपये किंमतीच्या कापडाची निर्यात करण्यांत आली. न्यूयॉर्क येथें भरणाऱ्या जागतिक व्यापारी प्रदर्शनांत मंडळ भाग घेणार आहे. प्रदर्शनांत ५० लाख रुपये किमतीच्या हातमागाच्या कापडाची विक्री करतां येईल असा विश्वास वाटत आहे.

### काश्मीरला जाणारे हौशी प्रवासी

काश्मीरला जाणाऱ्या हौशी प्रवाश्यांचा पहिला हंगाम लवकरच सुरू होइल. गेल्या वर्षी काश्मीरच्या प्रवासाचें सौख्य अनुभवणाऱ्या प्रवाश्यांची संख्या ८४ हजारांपेक्षा जरा कमी होती. त्यांपैकीं ११ हजारांवर प्रवासी परदेशीय होते. ह्या वर्षी १ लाख प्रवासी काश्मीरला जातील असा अंदाज आहे. काश्मीरला जाणाऱ्या मध्यमवर्गीय प्रवाश्यांच्या सोयींकडे यंदा अधिक लक्ष पुरविण्यांत येत आहे. हौशी प्रवाश्यांच्या भ्रमंतीमुळें काश्मीर सरकारला चांगलें उत्पन्न मिळतें. गेल्या वर्षी ह्या प्रवाश्यांनीं राज्याच्या खजिन्यांत ४ कोटी रुपयांची भर घातली.

### सिलोन सोडण्यासाठी प्रलोभन

सिलोनमध्यें मजुरीसाठी गेलेल्या तामीळ भाषिकांनीं जर भारताचें नागरिकत्व पत्करण्याचें ठरविलें तर त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी १९५४ मध्यें भारत व सिलोन ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आला होता. सीलोनमध्यें पोटासाठी राबणाऱ्या ह्या लोकांनीं सिलोनचें नागरिकत्व पत्करलें नाहीं तर त्यांना सिलोनमध्यें राहाणें कठीण होणार आहे. जीं तामीळ कुटुंबें आपखुषीनें भारतांत जाण्यास तयार होतील त्यांना कुटुंबामागें १हजार रुपये देण्याची एक योजना सिलोन सरकारनें जाहीर केली आहे. ही सवलत मुख्यत: कांहीं अटींवर सिलोनमधील मळयांत काम करणाऱ्या मजुरांच्या कुटुंबांनाच देण्यांत येणार आहे.

### ब्रिटन रशिआला कारखाने पुरविणार

ब्रिटन व रशिया ह्यांच्यांत नवा व्यापारी करार करण्यांत येणार आहे. करारांत ठरल्याप्रमाणें ब्रिटन रशिआला कृत्रिम धागे तयार करणारे आणि रासायनिक खतें तयार करणारे संपूर्ण कारखाने तर पुरविणार आहेच; पण त्याशिवाय रशिआसाठी ग्लॅसगो येथील बोटी बांधण्याच्या गोद्यांतून बोटीहि बांधणार आहे. करार झाला तर पश्चिम युरोपांत व्यापार वाढविण्याची एक फार मोठी संधि रशिआला मिळणार आहे. १९५९ सालीं रशिआशीं ब्रिटननें केलेल्या करारापेक्षा नव्या संकल्पित कराराची व्याप्ति बरीच मोठी आहे. त्यामुळें ब्रिटिश-कारखानदारांच्या कांहीं उत्पादन-प्रक्रियाच रशियाला परवान्याच्या मार्गानें मिळणार आहेत.

### सारथ्याशिवाय आगगाडी

लंडनच्या भूमिगत रेल्वेमार्गावर १९६८ पासून सारथ्याशिवाय धावणारी एक आगगाडी चालू करण्यांत येणार आहे. ह्यासंबंधींची चांचणी नुकतीच घेण्यांत आली. पाहिल्यानें सुटणाऱ्या गाडींत बसविण्यांत आलेल्या स्वयंचलित उपकरणांच्या साह्यानें मागील गाडीचें नियंत्रण करण्यांत येणार आहे.

### असा आहे गोवा!

१९६१ सालीं परकीय अमलापासून मुक्त करण्यांत आलेल्या गोव्याची लोकसंख्या अवघी ६ लाखांच्या आसपास असून, क्षेत्रफळ सुमारें १४ शें चौरस मैल आहे. गोव्यांत ६ हजार मोटारगाड्या आहेत आणि ५० हजार रेडिओ आहेत. १९६३ सालीं गोव्यांतून १५ कोटी रुपयांचें लोखंडाचें खनिज निर्यात करण्यांत आलें. भारताच्या इतर भागांतून निर्यात करण्यांत आलेल्या खनिजापेक्षा गोव्याची निर्यात १॥ पट अधिक आहे.

### आकर्षक मांडणीबद्दल बक्षीस

ऑस्ट्रेलिआंतील पर्थ ह्या शहरांत भरविण्यांत आलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत भारतानें आपलें दालन उघडलें होतें. ह्या दालनाच्या आकर्षक मांडणीबद्दल त्याला पहिलें बक्षीस देण्यांत आलें आहे. सुमारें ७५ हजार प्रेक्षकांनीं दालनाला भेट दिली. उत्तम प्रतीच्या भारतीय चहाचे ६ हजार कप विकण्यांत आले. आणि दार्जिलिंग चहाचे १ हजार पुडे प्रदर्शनांत खपले.

### दाढीच्या पात्यांची निर्यात

स्वत:च्या हातानें दाढी करण्याच्या वस्तऱ्याची २७ कोटी पातीं रशिआ भारताकडून ह्या वर्षी घेणार आहे, ह्यांपैकी ९ कोटी पातीं ताबडतोब पुरविण्याचा करार एक हिंदी कंपनी आणि रशिआचे परदेशीय व्यापार मंडळ ह्यांच्यांत नुकताच करण्यांत आला आहे. ह्या पात्यांच्या उच्च दर्जामुळें रशिआंत त्यांना चांगली मागणी आहे. १९६३ सालीं भारतानें रशिआला १४ कोटी पात्यांची निर्यात केली. रशिआची सर्व मागणी ताबडतोब पुरी करणें भारतामधील संबंधित कारखान्यांना शक्य नाहीं; कारण त्यांच्याजवळ इतका मोठा सांठाच शिल्लक नाहीं. त्यामुळें नाइलाजानें सध्यां ९ कोटी पातीं पुरविण्याचा करार करण्यांत आला आहे. मॉस्कोमध्यें गेल्या सालीं भरविण्यांत आलेल्या हिंदी औद्योगिक प्रदर्शनापासून रशिआंत भारतीय मालाची अधिक माहिती झाली आहे.

### केळीं आयात करण्यापूर्वी दक्षता

इतर कांहीं देशांप्रमाणें जपानहि भारतामधून केळीं आयात करण्यास उत्सुक आहे. मात्र केळयांच्या आयातीचा करार करण्यापूर्वी, केळीं निर्यात करण्यांत येत असतां त्यांच्याबरोबर वनस्पतींना होणारा एखादा रोगहि जपानमध्यें येऊं नये अशी दक्षता घेण्यांत येत आहे. केळयांची पाठवणी करतांना काय खबरदारी घेण्यांत येते तें पहाण्यासाठी जपानी तज्ज्ञांचें एक मंडळ लवकरच भारतांत येणार आहे. भारतांत मद्रास, आंध्र प्रदेश, केरळ, म्हैसूर, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांत केळयांची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यांत येते. ह्या सर्व राज्यांच्या उत्पादनकेंद्रांना जपानी तज्ज्ञ भेटी देणार आहेत.

### दैनिकांच्या संख्येंत वाढ

| वर्ष | दैनिकांची संख्या |
|---|---|
| १९५६ | ४२४ |
| १९५७ | ४४६ |
| १९५८ | ४६५ |
| १९५९ | ४९१ |
| १९६० | ५३१ |
| १९६१ | ५२९ |
| १९६२ | ५६० |


# श्री महालक्ष्मी सहकारी बँक लिमिटेड, कोल्हापूर

## नवीन इमारतीचें उद्घाटन

दक्षिण महाराष्ट्रांतील सहकारी चळवळींत विशेष स्थान प्राप्त झालेल्या श्री महालक्ष्मी बँकेचा इतिहास उल्लेखनीय आहे. वटवृक्षाचें झाड हें प्रथमत: लहान दिसलें तरी त्याचा प्रचंड वृक्ष होऊन त्याच्या छायेखाली अनेकांना विश्रांतिस्थानाचा लाभ होतो. त्याप्रमाणें प्रारंभीं अतिशय लहान प्रमाणांत आयोजित केलेल्या या संस्थेचें आज जें प्रचंड व लोभनीय स्वरूप या नव्या इमारतीच्या दर्शनानें साकार होत आहे, यावरून या बँकेच्या आजच्या सुस्थिर स्थितीचें आकलन होणार आहे.

बँकेची सुरवात सन १९३३ सालीं श्री महालक्ष्मी को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या नांवानें श्री. उमराणीकर वैद्य, श्री. आप्पासाहेब महेकर व त्यांचे कांहीं मित्र यांनीं मिळून दि. २०-९-३३ रोजीं स्थापना केली. संस्था नोंदवितांना नियोजित भांडवल १०,००० रु. पांच रुपयांच्या २००० भागांत विभागलेलें होतें व कर्ज-मर्यादा ५०० रुपयांची होती. कर्जाचा व्याजाचा दर नऊ रुपये सहा आणे होता. म्हणजे अगदीं लहान प्रमाणांत ही सुरुवात होऊन संस्थेची पहिली साधारण सभा दि. १०-११-३३ इ. रोजीं झाली व त्या वेळीं श्री. विनायकरावजी महेकर यांची अध्यक्ष म्हणून व श्री. श्रीपाद जिवाजी देशपांडे यांची ऑनररी सेक्रेटरी म्हणून निवड करण्यांत आली. त्या दिवशीं संस्थेच्या सभासदपटावर ६५ सदस्यांची नोंद होऊन संस्थेचें दैनंदिन कामकाज चालूं करण्यांत आलें. कामकाज चालूं होतें एका दीड खणाच्या जागेंत व अगदीं साध्यां बैठकीवर. प्रारंभीं सकाळ व सायंकाळ अशी ऑफिसची दुवक्त वेळ ठेवण्यांत आली होती. त्या वेळच्या संस्थेच्या स्थितींत व आज ३० वर्षांच्या नंतरच्या स्थितींत जें महदंतर दिसत आहे त्यावरून संस्थेनें केलेल्या महनीय प्रगतीचा आढावा घेतांना कोणालाहि संस्थेच्या कार्याबद्दल अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

१९४८ च्या म. गांधींच्या वधोत्तर वावटळींत जाळपोळीची झळ या संस्थेला प्रत्यक्षपणें लागून संस्थेचे कांहीं कागदपत्र व फर्निचर जळालें नसतें तर संस्थेची आज दिसणारी प्रगति यापूर्वीच दिसली असती ! त्या वेळच्या जाळपोळीचा आघात कांहीं काळ बँकेच्या स्थैर्यावरहि झाला. एक क्षण असा होता कीं बँकेची आर्थिक सुरक्षितता कोसळून या बँकेशीं संबंधित असलेलीं अनेक कुटुंबें धुळीला मिळतात कीं काय असा संभ्रम उत्पन्न झाला व



श्री. यशवंत वि. शिराळकर, अध्यक्ष


श्री. यशवंत विष्णु शिराळकर, बी. ए., एलएल. बी., ॲड्व्होकेट हे बँकेचे या वर्षाचे अध्यक्ष असून, बँकेच्या गेल्या ३० वर्षांच्या इतिहासांतील सर्वांत तरुण असे अध्यक्ष आहेत. बँकेच्या उत्कर्षासाठी यांनीं सातत्यानें परिश्रमपूर्वक काम केलेलें असून अध्यक्ष म्हणून या वर्षाची त्यांची सेवा महत्त्वपूर्ण आहे.

त्याहि स्थितींत संस्थेच्या कार्यकारी मंडळानें व प्रामुख्यानें अध्यक्ष श्री. दा. श्री. मुनीश्वर, मॅनेजर ना. गो. मुनिश्वर व श्री. उमराणीकर वैद्य आणि बँकेचा सेवकवर्ग आणि कार्यकर्ते यांनीं व्यक्तिगत प्रतिष्ठा पणाला लावून भगिरथ प्रयत्न केले म्हणूनच आजचा हा सुदिन पाहाण्याचें भाग्य सर्वांना लाभलें आहे.

### शिवाजी उद्यमनगरमध्यें बँकेची शाखा

बँकेनें १९६० सालीं शहरांतील शिवाजी उद्यमनगर या भागांत आपली शाखा चालू करून उत्पादक कर्जासाठी उद्यमनगरमधील अनेक कारखानदारांना भांडवल पुरवून, कोल्हापूरच्या औद्योगिक प्रगतीला सक्रिय मदत केली आहे. उपनगरमध्येंहि तेथील सोसायटीकडून तीस हजार रकमेस एक नवी इमारत खरेदी केली आहे व त्याच ठिकाणीं आज बँकेची शाखा चालू केली आहे. यापुढें औद्योगिक क्षेत्रांत बँकेनें पदार्पण करून व्याप, महत्त्व व वैशिष्ट्यपूर्णतेनें आपलें नांव प्रस्थापित केलें आहे.

| वर्ष | सभासद | भाग भांडवल हजार रु. | निधी ह. रु. | ठेवी ह. रु. | गुंतवणूक ह. रु. | कायम मालमत्ता (ह. रु.) | कर्ज (ह. रु.) | थकबाकी प्रमाण % | निव्वळ नफा (शेंकडे) | डिव्हिडंड चा दर % | खेळतें भांडवल (ह. रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ वें | ४८९ | ६ | १ | ५३ | ० | ० | ३१ | ६ | १४ | ७॥ | ६३ |
| १० वें | १००९ | १५ | ६ | १४१ | २८ | ० | ६५ | ५ | २८ | ७॥ | १६६ |
| १५ वें | १९३० | ७१ | १४ | ५९८ | १८२ | ८ | ४१५ | ११ | ३३ | — | ६९९ |
| २० वें | २५५० | ११२ | ४८ | ११८९ | ६०१ | १३ | ६६६ | १४ | ४२ | ३½ | १३८४ |
| रौप्य महोत्सवी | | | | | | | | | | | |
| २५ वें | ३१३४ | १४० | १०९ | १४६३ | ६७३ | २४ | ८२१ | २७ | १२४ | ४ | १८४२ |
| २८ वें | ३६८६ | १६४ | १८५ | २४७७ | ९४० | ४० | १६६२ | १४ | २०६ | ६ | २९६९ |
| ३० वें | ४१८३ | १९० | २२१ | ३१८७ | १३०७ | १७० | १९३९ | १४ | ३०३ | ६ | ३७७६ |
| ३१ वें चालू | ४६६४ | २०० | २३७ | ३५२३ | १०३५ | २६६ | २२३७ | १७ | ४०५ | — | ४२३७ |




श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड कोल्हापूरच्या नवीन इमारतीचें छायाचित्र


**माननीय नामदार श्री. वसंतराव नाईक, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

**यांच्या शुभ हस्तें दि. ५–४–६४ इ. रोजीं आमच्या नवीन इमारतीचें उद्घाटन झालें,**

**हें विदित करणेस आनंद होत आहे.**

संस्थेच्या स्थापनेपासून सतत 'अ' वर्गांत असलेली कोल्हापुरांतील एकमेव नागरी सहकारी बँक

# श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

( स्थापना : १९३३ )

मुख्य कार्यालय :
२८ सी गुजरी, कोल्हापूर
दूरध्वनि नं. २३७

शाखा कार्यालय :
शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर
दूरध्वनि नं. ७०४

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | .... | रु. २,००,००० |
| खपलेलें भाग भांडवल | .... | रु. १,९९,७६० |
| गंगाजळी व इतर निधी | ... | रु. २,३७,७१५ |
| ठेवी | .... | रु. ३६,७२,००० |
| सभासद | .... | ५,१९६ |
| कर्जें | .... | रु. २१,४०,८२५ |
| खेळतें भांडवल | .... | रु. ४४ लाखांवर |

टीप : आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात आणि उद्योगधंद्यांना व व्यापाऱ्यांना कर्जपुरवठा केला जातो. आमचे नवीन इमारतींत सेफ डिपॉझिटची, लॉकर्सची सोय केलेली आहे. बँकेचें दैनंदिन कामकाज दि. ६–४–१९६४ इ. पासून बँकेच्या नवीन इमारतींत सुरू झालें आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

गो. बा. कुलकर्णी
इन्चार्ज मॅनेजर

य. वि. शिराळकर
बी. ए., एलूएल. बी., ॲड्व्होकेट, अध्यक्ष

## चलनवाढ : जागतिक प्रवृत्ति

१८ व्या आणि १९ शतकांत चलनाची किंमत सामान्यत: स्थिर होती, त्यामुळें महागाईची आणि चलनवाढीची झळ फारशी अनुभवाला आली नाहीं. पहिल्या जागतिक युद्धानंतर चलनवाढीचे तीव्र दुष्परिणाम प्रत्यक्ष अनुभवास आले. जर्मन मार्कची किंमत क्षणागणिक उतरत गेली आणि जर्मन कोट्याधीश भिक्षेकरी बनले. जर्मनींतील हॉटेलचे दर प्रत्येक तासीं बदलावे लागत. सकाळीं मार्कची किंमत १ पौंड = २०,००० मार्क असली, तर संध्याकाळपर्यंत १ पौंड = २५,००० मार्क अशी ती घसरे. एक अमेरिकन एक कॅमेरा खरीदण्यास गेला, त्याची हकीकत सांगतात. कॅमेऱ्याला १,००,००० मार्क पडतील असें त्याला दुकानदारानें सांगितलें. किंमत पटून तो प्रत्यक्ष घेतांना मात्र त्याला १,१०,००० मार्क द्यावे लागले. कारण, मधल्या दोन–तीन मिनिटांत मार्कची किंमत आणखी घसरली होती ! चलनाची किंमत किती वेगानें घसरू शकते, ह्याचा जागतिक इतिहासांत जनतेला आलेला हा पहिलाच अनुभव होता. पुढें किंमती डॉलर किंवा पौंड ह्या चलनांत सांगण्यांत येऊं लागल्या; कठीण आणि मऊ (हार्ड आणि सॉफ्ट) चलनानें ओळखल्या जाणाऱ्या चलनाला येथून प्रारंभ झाला.

चीनमध्यें चिनी डॉलरहि असाच कोसळला, त्यानेंहि चलनवृद्धीच्या आपत्तीची जाणीव करून दिली. त्या वेळीं छापण्यांत येणारी सर्वांत कमी किमतीची चिनी नोट १०,००० चिनी डॉलरची होती. जर्मनीमधील चलनवृद्धीवर जर्मन सरकारनें डॉ. शाख्ट ह्या 'जादूगार' अर्थशास्त्रज्ञाच्या सल्ल्यानें केलेली उपाययोजना यशस्वी झाली; चीनमधील चलनवृद्धि राजकीय उपायानें आटोक्यांत आणली गेली. दोन्ही देशांतील राजकीय आणि आर्थिक घडी आमूलाग्र बदलल्यावरच हें शक्य झालें.

गेल्या तीस-चाळीस वर्षांत जगांतील प्रत्येक देशामध्येंच चलनवाढ मुरली आहे. कांहीं देशांनीं चलनाची किंमत उतरवून ह्या प्रवृत्तीस आळा घालण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या महायुद्धानंतर हळूहळू चलनवाढ रोखून धरली गेली असती; पण कोरिअन युद्धानें पुनः सर्वत्र चलनवाढीस आवाहन केलें. तें युद्ध संपलें आणि आर्थिक व राजकीय स्थैर्य निर्माण झालें, तरी चलनवाढ चालूच आहे ! ह्यापुढें चलनवाढ ही नित्याचीच बाब राहणार, असें लोकांना वाटूं लागलें आहे.

जोंपर्यंत उपलब्ध जिनसांच्या पुरवठ्यापेक्षा लोकसंख्या जास्त असेल, तोंपर्यंत चलनाचा फुगवटा टाळतां येणार नाहीं, असें म्हणतां येईल. लोकसंख्येच्या वाढीला आळा घालणाऱ्या नैसर्गिक बाबी आतां फारच कमी झाल्या आहेत. तांत्रिक प्रगति, वैद्यकीय प्रगति, इस्पितळांच्या वाढत्या सोई, ह्यामुळें मृत्यूचें प्रमाण उतरलें आहे, आयुर्मर्यादा वाढली आहे आणि उपभोग्य जिनसांची मागणी त्यामुळें वाढत आहे. सहाजीकच, जिनसांचा पुरवठा त्या प्रमाणांत सुधारला नाहीं, कीं महागाई आणि चलनवाढ आलीच.

मंद गतीनें सतत होत जाणारी चलनवाढ आणि आकस्मिक चलनवाढ ह्यांत फरक आहे. कॅनडा, बेल्जम, स्वित्झरलंड, अमेरिका ह्यांसारख्या देशांत हळूहळू, सालोसाल, महागाई वाढत आहे; परंतु तेच देश समृद्ध आहेत; तेथील लोकांची रहाणी उच्च दर्जाची आहे. अविकसित देशांतील चलनवाढ भयानक वाटते, कारण त्या वाढीचा परिणाम राहणीचा दर्जा खालावण्यांत होतो. वेगवेगळ्या देशांतील चलनवाढीची गति वेगवेगळी आढळते. जिनसांची किंमत फारच भारी असल्यामुळें बहुतेकांना ते खरीदतां आले नाहींत, तर ह्या किंमतीनें निर्माण केलेल्या महागाईचे भयंकर दुष्परिणाम होतात. भारतासारख्या अविकसित देशांत हीच परिस्थिति आहे. जेथें उच्च रहाणीमुळें मागणी इतकी मनस्वी आहे, कीं, ती पुरविणें अशक्य आहे, तेथें महागाईचें कारण अनियंत्रित मागणी हें असतें. अमेरिकेसारख्या देशांतील महागाईचें हें कारण असतें. हे दोन्ही प्रकार तात्विकदृष्ट्या वेगळे दिसले, तरी ते एकत्रहि आढळूं शकतात. मजुरीमधील वाढ हेंहि महागाईचें एक कारण संभवतें; परंतु त्यासंबंधीं अर्थशास्त्रज्ञांत तीव्र मतभेद आहेत. ह्यासंबंधीं निश्चित अनुमानें काढणें कठीण आहे; उपाययोजनाहि करणें सोपें नाहीं.

### चलनाची घसरती किंमत : जागतिक प्रवृत्ति

(चलनाची किंमत १९५२ = १००)

| देश | वार्षिक घट % | | | |
|---|---|---|---|---|
| | १९६१ | १९६२ | १९५२-६२ | १९६१-६२ |
| कॅनडा | ९१ | ९० | १·१ | १·० |
| बेल्जम | ९० | ८९ | १·२ | १·० |
| स्वित्झरलंड | ९२ | ८८ | १·२ | ३·७ |
| अमेरिका | ८९ | ८८ | १·३ | १·० |
| जर्मनी | ८९ | ८६ | १·५ | ३·७ |
| इटली | ८४ | ८० | २·२ | ४·६ |
| द. आफ्रिका | ८१ | ८० | २·२ | १·० |
| ऑस्ट्रिया | ८४ | ७९ | २·३ | ५·४ |
| भारत | ८२ | ७९ | २·३ | ३·६ |
| नेदरलंडस् | ८१ | ७८ | २·४ | ३·७ |
| ग्रेट ब्रिटन | ७८ | ७४ | २·९ | ३·७ |
| स्वीडन | ७७ | ७४ | ३·० | ४·५ |
| जपान | ७७ | ७२ | ३·२ | ५·९ |
| फ्रान्स | ७३ | ७० | ३·५ | ४·२ |
| मेक्सिको | ६२ | ६२ | ४·७ | - ०·९ |
| स्पेन | ६३ | ६० | ५·० | ५·१ |
| टर्की | ४१ | ३९ | ८·९ | ४·२ |
| अर्जेंटिना | १४ | ११ | १९·७ | २१·८ |
| ब्राझील | १३ | ९ | २१·५ | ३३·८ |

### समुद्राच्या पाण्यापासून गोडें पाणी

मद्रास शहराला लागणाऱ्या गोड्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी किनाऱ्याजवळील समुद्राच्या पाण्यांतील क्षार काढून टाकण्याची शक्यता अजमावण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेंतील कांहीं शास्त्रज्ञांना पाचारण करण्यांत येणार आहे. ह्यासंबंधीं करण्यांत आलेल्या चौकशीवरून असें दिसून आलें आहे कीं समुद्राच्या पाण्यापासून पिण्यासारखें गोडें पाणी करतां येणें शक्य असलें तरी तें खर्चाच्या दृष्टीनें परवडण्यासारखें नाहीं. परंतु समुद्राच्या पाण्यांत असलेलीं मीठ आणि इतर रासायनिक द्रव्यें खाऱ्या पाण्यापासून गोडें पाणी करण्याच्या प्रक्रियेच्या वेळींच वेगळीं काढतां आलीं तर मात्र ही योजना आर्थिकदृष्ट्या यशस्वी होण्याची शक्यता आहे.

# सामाजिक उद्दिष्टें आणि बँका

## महाराष्ट्र बँकेचें धोरण

( श्री. वा. पुं. वर्दे ह्यांचें महाराष्ट्र बँकेच्या वार्षिक सभेंत अध्यक्षीय भाषण )

आपल्या बँकेची स्थापना झाली ती मागासलेल्या महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक विकासास हातभार लावण्याचें सामाजिक उद्दिष्ट जाणीवपूर्वक समोर ठेवून झाली; केवळ एक नवीन बँक म्हणून नव्हे. ही बँक कांहीं उद्योगपतींनीं स्वतःचे धंद्यास कर्जे देण्यासाठी सुरू केलेली नाहीं. तिची मालकी व नियंत्रण हे केव्हांहि मूठभर हितसंबंधी व्यक्तींच्या हातीं नव्हते व आजहि नाहीं. ज्या सामाजिक उद्दिष्टाचे पूर्ततेसाठी या बँकेची स्थापना झाली, तें उद्दिष्ट जर राष्ट्रीयीकरण झाल्यानें अधिक चांगल्या तऱ्हेनें साध्य होत असेल तर मी त्या घटनेस विरोध तर करणार नाहींच; उलट तिचें आनंदानें स्वागत करीन. पण माझा स्वतःचा व उद्योगधंद्यांत पदार्पण करणाऱ्या इतर उत्साहि तरुण मंडळींचा अनुभव मात्र असा आहे कीं, दप्तरदिरंगाई आणि विलंबप्रधान कार्यवाही यांमुळें सरकारी मालकीच्या संस्थांचें मूळ उद्दिष्टच असफल होतें. यामुळें बँकांचें राष्ट्रीयीकरणास माझा तीव्र विरोध आहे.

### राष्ट्रीयकरणास विरोध का ?

बँकांचें राष्ट्रीयीकरणाचे समर्थनार्थ करण्यांत येणारे युक्तिवाद मला पटत नाहींत. सत्तेच्या केंद्रिकरणासंबंधीं बोलावयाचें तर बँकांवर असा आरोप करणें युक्त होणार नाहीं. कारण बँकांचे बाबतींत एका भागधारकास कमाल मताधिकार परवांपर्यंत वसूल भांडवलाचे पांच टक्के इतकाच होता व आतां तर तो एक टक्क्या- इतकाच करण्यांत आला आहे. उलट, बँकांचे राष्ट्रीयीकरणामुळें मात्र राजकीय व आथक सत्ता अधिकारारूढ राजकीय पक्षाचे हातांत केंद्रित होण्याचा धोका आहे व ज्याच्या हितासाठी म्हणून राष्ट्रीयीकरणाची मागणी एवढ्या जोरानें करण्यांत येत आहे त्या सामान्य माणसाला मात्र त्यामुळें कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं.

### राजकीय निर्णय नको

राष्ट्राच्या विकासासाठी मोठ्या उद्योगधंद्याप्रमाणेंच लहान उद्योग- धंद्यांचीहि आवश्यकता आहे आणि बँकांचें राष्ट्रीकरण झालें तरी मोठ्या उद्योगधंद्यांना लागणारें आर्थिक साहाय्यहि मोठ्या प्रमाणा- वरच लागणार. मोठ्या बँकांकडून लहान व्यक्तींची उपेक्षा झाली तर त्यावर योग्य मार्ग म्हणजे त्याच्या गरजा भागविणाऱ्या संस्था काढणें हा होय. शेतीमालाचे उत्पादनासाठी कर्जे देण्याबद्दल बोलावयाचें तर एक तर व्यापारी बँकांजवळील उपलब्ध पैसा औद्योगिक व व्यापारासाठी लागणाऱ्या कर्जाची गरज भागविण्या- साठींच पुरेसा नाहीं आणि दुसरें असें कीं, हे शेतकरी खेड्यां- तून दूरवर पसरलेले असल्यामुळें पिकांच्या तारणावर कर्ज देण्या- साठी लागणारी देखरेख-यंत्रणा उभी करणें बँकांस शक्य नाहीं. याच कारणांसाठी रिझर्व्ह बँकेनें नेमलेल्या शेतकी पतपुरवठा पाहणीसमितीचा अहवाल विचारांत घेऊन, पिकांच्या तारणावर कर्जे देण्यासाठी सहकारी तत्त्वावर आधारलेली एक सुसूत्र योजना तयार करण्यांत आली आहे. शेतकऱ्यांस हितकारी असणाऱ्या या सहकारी यंत्रणेच्या क्षेत्रांत व्यापारी बँकांनीं अतिक्रमण करून त्यांच्या वाढीस खीळ घालणें युक्त होणार नाहीं असें माझें मत आहे. किंबहुना, देशांतील औद्योगिक क्षेत्राची द्रुत गतीनें वाढ व विकास होण्यासाठीहि बँकांची अशीच एखादी यंत्रणा योजनापूर्वक निर्माण करणें आवश्यक आहे : आजची खरी आवश्यकता शांतपणें विचार करून आर्थिक निकषावर आधारित असा निर्णय घेण्याची आहे; राजकीय बैठकीवरील निर्णयाची नव्हे.

म्हणून माझी अशी सूचना आहे कीं, अनुभवी अधिकारी व अशा अर्थशास्त्रज्ञांच्या आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या बँकिंगच्या व औद्योगिक क्षेत्रांतील व्यक्तींची एक समिति स्थापण्यांत यावी व तिनें या विषयाचा सांगोपांग अभ्यास करावा व देशाच्या दृष्टीनें हितकारक असें बँकिंगबाबतचें एकंदर धोरण, कार्यपद्धति यांसंबंधीं निर्णय घ्यावा. अशा अहवालानंतर जर सरकारला बँकांचें राष्ट्रीयीकरण हें अपरिहार्य आहे असें वाटलें तर त्या निर्णयास कोणीहि विरोध करणार नाहीं. पण त्या बाबतींत सुद्धां अखिल देशासाठी, सगळीकडे शाखांचें जाळें असलेली अशी एकच एक राष्ट्रीय बँक असण्यापेक्षा, बँकिंगची यंत्रणा ही राज्यवार असावी असें माझें मत आहे.

### महाराष्ट्र बँकेची प्रगति

३१ डिसेंबर १९६३ रोजीं आपलें वसूल भांडवल साठ लाख रुपये होतें, तें या वर्ष-असेर, अभिमान वाटण्यासारखें असें, ऐशीं लाख रुपये होईल. आपल्या गंगाजळींत आतां तीस लक्ष, नव्वद हजार रुपये इतकी रक्कम झाली आहे. आपल्या भांडवलाची रकम गेल्या वर्षी शहात्तर लक्ष, पंचावन्न हजार रुपये होती ती आतां एक्याण्णव लक्ष, वीस हजार रुपये झाली आहे. आपल्या ठेवींची रक्कम दोन वर्षांपूर्वी एकोणीस कोटी रुपये होती. गतवर्षी ती सुमारें पंचवीस कोटी होती. ती आतां तीस कोटींचे आसपास आली आहे. अहवालाचे वर्षी एकूण शेड्यूल्ड बँकांचे ठेवींत साडेबारा टक्के वाढ झाली, तर आपले बँकेचे बाबतींत ती वीस टक्के झाली आहे. भागधारक व जनता यांनीं बँकेवर जो विश्वास व्यक्त केला आहे त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतों.

आपण रिफायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून मिळणाऱ्या कर्जसवलतीचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. अशा तऱ्हेनें उपलब्ध पैसा वाढल्यामुळें नव्यानें निघणाऱ्या अगर प्रस्थापित धंद्याची वाढ करूं इच्छिणाऱ्या उद्योगधंदेवाल्यांस मध्यम मुदतीचीं कर्जें देणें आपणांस शक्य झालें आहे. भांडव- लाचे तरतेपणाचें प्रमाण नेहमींप्रमाणेंच चांगलें राखण्यांत आलें आहे. आपले गुंतवणुकीचे ठेवींचें रकमेशीं प्रमाण ४५·१० टक्के आहे व एकूण गुंतवणुकींत सरकारी रोखे व विश्वस्त रोखे ( ट्रस्टी सिक्युरिटीज़् ) यांचें प्रमाण ९४·४० टक्के आहे.

औद्योगिक कंपन्यांचे व त्यांतहि विशेषतः महाराष्ट्राच्या अवि- कसित भागांत स्थापन होणाऱ्या कंपन्यांचें भाग भांडवल खपविण्याची, आपण अगर दुसरे कोणाचेमार्फत हमी घेण्यासहि ( अंडररायटिंग ) आपण सुरुवात केली आहे.

### कर्जें देण्याचें धोरण

आपण नेहमीं मध्यम व लहान आकाराच्या उद्योगधंद्यांस अग्रहक्क देत आलों आहोंत. या कर्जांचे बाबतींत आपण तंत्र- विषयक पात्रता, कर्जदाराची सचोटी व संकल्पित योजनेचा भरीव- पणा या गोष्टी प्रामुख्यानें विचारांत घेतों. केवळ मालमत्तेच्या तारणाचा विचार करीत नाहीं. या आपल्या धोरणामुळें अनेक लहान उद्योगधंद्यांचे चालक आपल्या बँकेकडे येतात. गेलीं अठ्ठा- वीस वर्षें, दिलेल्या कर्जाचा सचोटीनें उपयोग करून उत्पादन- वाढीस हातभार लावणाऱ्या व्यक्तीस साहाय्य करण्याचा आपण प्रयत्न करीत आलों आहोंत व आपला अनुभव उत्तेजनकारक आहे. ३१ डिसेंबर १९६३ रोजीं आपल्या कर्जदारांची संख्या ८,६९० होती, त्यांतील पांच हजार रुपयांपर्यंत कर्जे घेणाऱ्यांची

संख्या ६,१९० होती, म्हणजे एकूण कर्जदारांच्या ७१·१ टक्के होती. पांच हजार ते हजार रुपये कर्ज घेणाऱ्यांची संख्या ८६५ होती. त्यांचें एकूण कर्जदारांशीं प्रमाण दहा टक्के पडतें.

आपले बँकेनें सुरवातीपासून समोर ठेवलेल्या सामाजिक उद्दिष्टांस अनुसरून लहान उद्योगधंद्यांचे होतकरू चालकांचे गरजांकडे लक्ष पुरविणें हें आपलें धोरण आहे. आपल्या बँकेची स्थापना ही खातेदारांच्या ठेवींचे सुरक्षिततेची योग्य ती दक्षता घेऊन देशाचें व विशेषतः महाराष्ट्राचे आर्थिक, औद्योगिक व सामाजिक विकासास हातभार लावण्याचें निश्चित उद्दिष्ट समोर ठेवून झाली. आम्हीं विदर्भ-मराठवाडा-कोंकण व पश्चिम महाराष्ट्र या वेगवेगळ्या भागांतील कार्यामध्यें समतोल राखण्याच्या प्रयत्न करीत आहोंत.

### बँकेच्या हितास सर्वच प्राधान्य देतात

अहवालाचे वर्षीं बँकेचे नोकरवर्गाशीं असलेले संबंध सलोख्याचे होते. त्यांचे सहकार्याशिवाय संस्थेची एवढी समाधानकारक प्रगति होऊं शकली नसती. बँकेचे सर्व ठेवीदार, ग्राहक व भागधारक बँकेबद्दल जो वाढता विश्वास व्यक्त करीत आहेत त्यामुळेंच मला व संचालक मंडळाला बँक ज्या उद्दिष्टासाठी स्थापन झाली तें उद्दिष्ट साध्य करून तिची प्रगति करणें शक्य होत आहे. बँकेचे सर्व अधिकारी व विशेषतः जनरल मॅनेजर श्री. जोग बँकिंगव्यवसाय अत्यंत कठीण परिस्थितींतून जात असतांना या प्रगमनशील संस्थेची धुरा अत्यंत आपुलकीनें व कळकळीनें वाहात आहेत. त्यांस मी मनःपूर्वक धन्यवाद देतों.

## इंडियन बँक्स असोसिएशन
### नवे पदाधिकारी

इंडियन बँक्स असोसिएशनची १७ वी वार्षिक सभा सोमवार, दि. ६ एप्रिल रोजीं भरली होती. त्या वेळीं श्री. तुलसिदास खिलाचंद (दि बँक ऑफ बरोडा लि.) ह्यांची चेअरमनचे जागीं फेरनिवडणूक झाली. श्री. बी. के. दत्त (दि युनायटेड बँक ऑफ इंडिया लि.) हे व्हाइस चेअरमन निवडून आले. गेल्या वर्षीचे ऑनररी सेक्रेटरी श्री. सी. ई. कामथ (दि कॅनरा बँक लि.) हे पुनः त्याच जागीं निवडून आले. कमिटीचे सभासद म्हणून श्री. सी. व्ही. जोग (दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.) ह्यांची पूर्ववत निवड झाली आहे.

### यूनिट ट्रस्टच्या भागांना मागणी

यूनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या भाग भांडवलापैकी १ कोटी रुपयांचें भांडवल शेड्यूल्ड बँका आणि कांहीं प्रकारच्या आर्थिक संस्था ह्यांचेसाठी राखून ठेवले होते.; त्यासाठी अर्जाची शेवटची तारीख ३१ मार्च, १९६४ ही होती. एकूण ३२ संस्थांनीं, प्रत्येकी ५०,००० रु. ते २५,००,००० रु. पर्यंत भागांची मागणी केली. एकूण मागणी १ कोटी रु. पेक्षा मोठी झाल्यामुळें ३ लक्ष रुपयांपर्यंतचे सर्व अर्ज मंजूर करून उरलेल्या १० संस्थांची जादा रक्कम परत करण्याचें ठरलें.

### पोलादाच्या कारखान्यांतील परदेशीय तंत्रज्ञ

भारताच्या मालकीच्या ३ पोलादाच्या कारखान्यांत मिळून गेल्या वर्षअखेर ५२९ परदेशीय तंत्रज्ञ काम करीत होते अशी माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे. रुरकेला येथील कारखान्यांत २५६ तंत्रज्ञ, भिलई येथील कारखान्यांत २१६ आणि दुर्गापूर येथील कारखान्यांत ५७, परदेशीय तंत्रज्ञ काम करीत आहेत. हें तंत्रज्ञ कारखान्यांचा दैनंदिन उत्पादनाच्या कामीं तर राबत आहेतच; पण कारखान्यांचा विस्तार करण्याच्या योजनांतहि सहकार्य करीत आहेत. ह्या दोन्ही कामाबरोबर हिंदी एंजिनिअर्सना शिकवून तयार करण्याचें कार्यहि ते करीत आहेत.

### दारूबंदीच्या धोरणांत वस्तुस्थितिनिष्ठ सुधारणा
(मुख्यमंत्री, श्री. नाईक ह्यांचें भाषण)

आज आपण पाहतों आहों कीं, दारूबंदीनें चोरट्या दारूचें प्रमाण वाढत आहे. चोरटी दारू गाळून त्यांचा व्यापार करून एक वर्ग श्रीमंत होत आहे व प्रामाणिकपणें कष्ट करून चरितार्थ चालविणाऱ्यावर त्याचा वाईट परिणाम होत आहे. काबाडकष्ट करणें चूक तर नव्हेना, असें त्याला वाटूं लागलें आहे आणि त्यामुळें श्रम-प्रतिष्ठेला जबरदस्त धक्का बसत आहे. समाजाच्या व देशाच्या दृष्टीनें त्यामुळें अनर्थमूलक परिस्थिति निर्माण झाली आहे. दारू पिणें वाईट आहे असें मानणारा सुद्धां सहज पैसा मिळविण्याच्या बुद्धीनें दारूचा व्यवसाय करायला प्रवृत्त होत आहे, आणि त्यामुळें मानवी मूल्यांना एक प्रकारचा हादरा बसूं लागला आहे. त्यामुळें दारू पिणारे वाढलेत आणि त्याबरोबर चोरट्या दारूचें प्रमाणहि वाढलें. महाराष्ट्रांत दारूबाबतचे सात लक्ष गुन्हे पकडण्यांत आले आहेत व त्यांपैकीं साडेचार लक्ष गुन्ह्यांत आरोपींना शिक्षा झाल्या. रक्तांत मद्यार्क आहे कीं नाहीं हें तपासून पाहण्याकरितां लाखों लोकांचें रक्त घेण्यांत आलें. केवळ कायद्यानेंच दारूबंदी करण्याचें धोरण तसेंच चालूं राहिलें तर नजिकच्या भविष्यांत दारूबाबतचे गुन्हे करणाऱ्यांची संख्या सारखी वाढतच राहणार आणि महाराष्ट्रांत बहुसंख्य लोक शाबित गुन्हेगार ठरतील कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. चोरट्या दारूमुळें ज्यांचा दारूशीं संबंध यायला नको अशाहि लोकांचा संबंध येऊं लागला. स्त्रिया, मुलें व रोगी यांचाहि या धंद्यामध्यें समावेश करण्यांत आला व लाखों लोकांच्या शरीरस्वास्थ्यावर या घाणेरड्या दारूमुळें भयानक परिणाम घडला. दारूबंदीच्या धोरणांत बदल कां करावा लागला याचें हें कारण आहे.

मद्य परवाना पद्धतींत सुधारणा करण्याचा सरकारचा उद्देश लोकांना दारूची चटक लावून त्यांना दारूबाज करण्याचा नसून, व्यसनासक्त लोकांना अत्यंत अपायकारक अशी चोरटी दारू हवी तेवढी घेऊं देण्यापेक्षा कमींत कमी अपायकारक मद्य विशिष्ट प्रमाणांत देण्याचा आहे.

### पृथ्वीच्या पोटांतून गरम पाणी

पृथ्वीचा मध्यवर्ती गाभा अतिशय उष्ण असल्याचें प्रसिद्धच आहे. ह्या उष्णतेचा उपयोग करून गरम पाणी मिळविण्याची आणि शहरांना उष्णता पुरविण्याची योजना रशिअन शास्त्रज्ञ तयार करीत आहेत. ह्यासंबंधीं भरविण्यांत आलेल्या शास्त्रज्ञांच्या परिषदेनें सैबेरिआंतील ऑम्स्क शहरानजिक ८;२०० फूट खोल विहीर खोदण्याच्या तांत्रिक प्रश्नांची चर्चा केली. ह्या विहिरीपासून ७० ते ८० अंश उष्णता असलेले पाणी मिळूं शकेल असा त्यांचा अंदाज आहे. अशा प्रकारच्या योजना यशस्वी झाल्यास रशिआ दरसाल १० ते १५ कोटी टन कोळसा वांचवून त्याचा अन्य कामासाठी उपयोग करू शकेल.


## तुमचें स्थान कोणतें ?

लेखक : श्री. वा. काळे

पृ. सं. ११० ] ◆ [ किं. २ रु.

## नदीनाल्यांचें पाणी दूषित होण्याचा धोका

अविकसित देशांची आर्थिक भरभराट घडवून आणण्यासाठी औद्योगीकरणाची कास धरण्यांत येते. पण, हें औद्योगीकरण साधतांना अनेक नवे प्रश्न उत्पन्न होत असतात. कारखान्यांच्या वाढीमुळें त्यामधून बाहेर सोडण्यांत येणाऱ्या आरोग्याला घातक अशा पाण्याचा उपद्रव पसरत जात असतो. नियोजित अर्थ-व्यवस्थेंत औद्योगीकरणामुळें उत्पन्न होणाऱ्या नवनव्या प्रश्नांचाहि विचार करण्यांत आला पाहिजे. परंतु, तो तसा करण्यांत येत नाहीं असें दिसतें. राजस्थानांतील कोटा शहराजवळच एक नाला चंबळ नदीला मिळतो. ह्या नाल्यांत त्याच्या कांठीं बसविलेल्या एका कारखान्याचें सांडपाणी सोडण्यांत आलेलें आहे. ह्या सांडपाण्यामुळें नाल्याचें पाणी इतकें दूषित झालें आहे कीं पाण्यांतून जाणाऱ्या माणसांच्या व गुराढोरांच्या पायांना फोड आल्याची बातमी आहे. एकाच कारखान्याच्या दूषित पाण्याचा एवढा प्रताप आहे. राजस्थानच्या ह्या भागांत २० कारखान्यांना परवाने देण्यांत आलेले आहेत. त्यांनींहि सांडपाण्याचा असाच निचरा केल्यास काय होईल ह्याची कल्पनाच केलेली नाहीं. वास्तविक नव्या कारखान्यांची स्थापना करण्यापूर्वी त्यांतून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याची व इतर पदार्थांची विल्हेवाट योग्य रीतीनें लावण्याची व्यवस्था झाली पाहिजे. गुजरात राज्यांत नदीनाल्यांच्या पाण्याबाबत हीं दक्षता घेण्यांत येत आहे. कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या वाया जाणाऱ्या पदार्थांची विल्हेवाट लावण्याची अट घालूनच त्यांना परवाना देण्यासंबंधीं कायदा करण्यांत येणार आहे.

---

## अमेरिकेंतील दारिद्र्याविरुद्ध मोहीम

प्रे. केनेडी ह्यांनीं अमेरिकेंतील दारिद्र्याची तीव्रता कमी करण्यासाठी एक योजना आखली होती. आतां ती प्रेसिडेंट जॉन्सन ह्यांनीं अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. पण अमेरिकेंतील दारिद्र्याचें स्वरूप कसें आहे ? अमेरिकन सरकारला आर्थिक सल्ला देणाऱ्या मंडळानें असें ठरविलें आहे कीं ज्या ४ माणसांच्या अमेरिकन कुटुंबाचें एकूण उत्पन्न सालीना ३ हजार डॉलर्सपेक्षा कमी असेल त्या कुटुंबाला गरीब समजण्यांत यावें व मदत करण्यांत यावी. अमेरिकेंतील कुटुंबांची एकूण संख्या सुमारें ४७ कोटी आहे आणि त्यांतील एक पंचमांश म्हणजे अंदाजें ९० लाख कुटुंबें वर दिलेल्या कसोटीप्रमाणें गरीब आहेत. ह्या कुटुंबांतील माणसांची संख्या ३ कोटींच्या जवळपास आहे. अमेरिकेसारख्या संपन्न देशांत इतकें 'दारिद्र्य' कां असावें ह्यासंबंधीं अर्थातच तपासणी करण्यांत आली. तेव्हां असें आढळून आलें कीं शिक्षणाचा अभाव हें दारिद्र्याचें सर्वांत मोठें आणि महत्त्वाचें कारण आहे. अमेरिकेंतील वंशभेदाचें वातावरण हें दुसरें मोठें कारण आहे. ह्या वातावरणामुळें अमेरिकेंतील निग्रोंच्या मुलांना अर्थार्जन करण्यास उपयुक्त असें शिक्षणच मिळणें कठीण जातें. ह्याचा परिणाम असा होतो कीं गोऱ्या कुटुंबांपेक्षा निग्रो कुटुंबें दरिद्री राहण्याची शक्यता अडीचपटीनें वाढते. या कारणांशिवाय अनारोग्य, पूर्ण वेळ काम करणाऱ्या एकट्या माणसाचा कुटुंबांत असणारा अभाव, किंवा कुटुंबाची झालेली पांगापांग इ. कारणेंहि आहेत. हीं व इतर कारणें एकदम नाहींशीं करतां येणारीं नसली तरी त्यांची तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न होणार आहेत.

---


पाहिलात फरक ?
मुलांचे आटून तोकडे झालेले कपडे, चुरगळलेल्या साड्या, सुरकुतलेले शर्ट व विजारी, असले गबाळेपणाचे दिवस आता गेले. आता सगळींजणच कशी रुबाबदार राहतात; कारण, सर्वजण नेहमी वापरतात --

ठाकरसी
फॅब्रिक्स
— फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती
या कापडावर असे लेबल असते SANFORIZED



ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
श्री हिंदुस्तान स्पिनिंग अॅण्ड वीव्हिंग मिल्स कं. लि.
श्री क्राऊन स्पिनिंग अॅण्ड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.
श्री इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.
THACKERSEY FABRICS

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९.९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १४.०४ „ |
| ठेवी | रु. | ३९२.९९ „ |
| खेळतें भांडवल | रु. | ४३४.०० „ |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

# विविध माहिती

**भारताचा आग्नेय आशियाशीं व्यापार**—आग्नेय आशियांतील देशांशीं भारताच्या चालू असलेल्या व्यापारांत चीन आणि जपानची स्पर्धा वाढत आहे. तरीसुद्धां भारताची ह्या भागांतील व्यापारी देवघेव वाढत्या प्रमाणावर आहे. गेल्या वर्षी ह्या व्यापारांत १ कोटी रुपयांची वाढ झाली. सिलोनमधील एका कंपनीशीं करार करून मसाल्याच्या पदार्थांची निर्यात वाढविण्याची खटपट करण्यांत येत आहे.

**मुलांच्या चित्रपटावरील कर**—मुलांना दाखविण्यासाठी तयार केलेल्या चित्रपटांवर घेण्यांत येणारे करमणुकीचे व इतर कर रद्द करण्यांत यावे अशी विनंति तद्विषयक संस्थेनें मध्यवर्ती व राज्यसरकारांना केली आहे. ह्या संस्थेची स्थापना १९६० सालीं झालेली आहे. कर माफ झाले तर मुलांसाठी तयार करण्यांत येणारे चित्रपट कमी खर्चांत करतां येतील असें संस्थेचें म्हणणें आहे.

**लोखंडाच्या खाणीसाठीं यंत्रसामग्री**—ओरिसा सरकारच्या मालकीच्या खाणी-कॉर्पोरेशननें एका हंगेरिअन कंपनीशीं करार करून लोखंडाची माती हलविण्याची यंत्रसामग्री विकत घेण्याचें ठरविलें आहे. यंत्रसामग्रीची किंमत ३ कोटी रुपये असून ती रुपयाच्या चलनांत देण्यांत यावयाची आहे.

**आणखी आपत्तींचें भविष्य**—अलास्का राज्यांत झालेल्या भीषण भूकंपाचें भविष्य एका स्वीडिश शास्त्रज्ञानें ५ महिन्यांपूर्वी वर्तविलें होतें. त्याच्या मतानें नैसर्गिक आपत्ति आणि अणुस्फोट ह्यांच्यांत कसला तरी संबंध आहे. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यांत अशाच नैसर्गिक आपत्ति कोसळतील असा त्याचा कयास आहे.

**रशिआ–चीन वादाचा प्रतिध्वनि**—रशिअन कम्युनिस्ट पक्षानें एम्. मोलोटोव्ह आणि जॉर्जी मॅलेकॉव्ह ह्यांना पक्षांतून काढून टाकलें आहे. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर सत्तास्थानीं आलेल्या त्रिमूर्तीत हे दोघे होते. रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह अधिकारावर आल्यावर ह्या दोघांना किरकोळ कामावर नेमण्यांत आले होते. रशिआ व चीन ह्यांच्यांत चालू असलेल्या वादांत एम्. मोलोटोव्ह चीनची बाजू घेतात असा पक्षाचा आरोप आहे.

**पोलादाच्या उत्पादनांत वाढ**— १९६२ च्या मानानें जगांतील कच्च्या पोलादाचें उत्पादन ६ टक्क्यांनीं वाढलें आहे. १९६३ सालीं ३८·८ कोटी मेट्रिक टन पोलादाचें उत्पादन झालें. हें उत्पादन १९६२ सालापेक्षा २·२ कोटी टनांनीं अधिक आहे. अमेरिका, रशिआ, जपान, आणि ब्रिटन ह्या देशांतील पोलादाच्या उत्पादनांत लक्षांत भरण्यासारखी वाढ झाली.


**अल्प बचतींत वाढ झाली**—१९६३ च्या एप्रिल महिन्यापासून १९६४च्या फेब्रुवारी अखेरपर्यंत अल्पबचत योजनेच्या द्वारां जमा झालेल्या रकमेचा आकडा ८९·४ कोटी रुपये आहे. १९५२-६३ सालांतील ह्याच कालावधींत ह्याच्या जवळ जवळ निम्म्यानें म्हणजे ४३·४ कोटी रुपयांची रक्कम जमा झाली होती.

**उसांच्या नव्या जातींची लागवड**—भारतामधील साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी सध्यां लावण्यांत येणाऱ्या उसांच्या जातींऐवजीं नव्या जातींच्या उसांची लागवड करण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. कोईमतूर येथील ऊंससंशोधन केंद्रानें एकरीं अधिक पीक देणाऱ्या उसांच्या जाति शोधून काढल्या आहेत.





बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.